# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १९/०२/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०३ कि.मी अंतरावरील खुटांबा रोड काटोल येथे दिनांक १८/०२/२०२२ चे २०.०० वा. ते २०.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ.करिश्मा सुदर्शन बोरकर वय २५ वर्ष रा. आमनेर ता.वरुड जि. अमरावती ह.मु. वाघोडा ता.काटोल व आरोपी नामे– सुदर्शन अशोक बोरकर वय २४ वर्ष रा आमनेर हे पती–पत्नी असुन त्यांच्यात नेहमी वादविवाद होत होते. तर फिर्यादी हिने दि. १०/०२/२०२२ रोजी पोलीस स्टेशन काटोल येथे रिपोर्ट दिलेल्या तक्रारीच्या राग आरोपीने मनात घेवुन दि. १८/०२/२०२२ रोजी फिर्यादी हिला रात्रीच्या अंधारात सुनसान ठिकाणी थांबवुन रिपोर्ट मागे घेण्यास सांगितले. तसेच आरोपीने फिर्यादी ''माझ्या सोबत आमनेर येथे परत चल'' असे म्हटले फिर्यादीने घरी परत जाण्यास नकार दिला असता आरोपीने त्याच्या कडील एका लहान चाकु सारख्या वस्तुनी फिर्यादीच्या डोळयावर, गालावर, मानेवर व पाठीवर सपासप वार करुन पराठीच्या शेतात ओढत नेले व तिचा गळा दाबुन जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास **पोउपनि परमेश्वर आगासे पोलीस स्टेशन काटोल मो.नं.** ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील उमरेड भिवापुर रोड ज्वेलर्सचे समोर येथे १८/०२/२०२२ चे ११.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– देवराव नत्थुजी फुकट, वय ५२ वर्ष, रा. रानबोडी पुनर्वसन यांनी महाराष्ट्र बॅक शाखा बायपास चौक, उमरेड येथील ग्राहक सेवा केंद्रातून १५,०००/– रू. अंदाजे ११.३० वा. नगदी काढले व फुलपॅटचे खालच्या खिशात ठेवले. यानंतर ते उमरेडमधून पायदळ आपले गावी रानबोडी जात असता यातील अज्ञात आरोपीने मागुन येवुन फिर्यादीस आवाज देवून म्हटले की, 'तुम्ही आता बॅकेतून पैसे काढले होते, तुमचा आधारकार्ड नंबर चुकीचा आहे' असे म्हणुन बरेच वेळ आधार कार्ड बघुन नंतर परत करून आरोपी पळुन गेला. फिर्यादीने आपले पॅटच्या खिशातील पैसे चेक केले असता मिळुन आले नाही. सदर अनोळखी आरोपीने फिर्यादीचे लक्ष विचलीत करून खिश्यातले पैसे चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक प्रदिप चवरे मो क्र ७७९८६६८८३८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**